**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५/२०१०</u>**
**<u>प्रतिवादीतर्फे सा.क्र.१</u>**
**<u>निशाणी क्र.११३ वर पुढे सुरु...</u>**

शपथेवर पुढे सुरु –

**<u>वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. डी. निंबाळकर यांच्यामार्फत उलटतपासः</u>**

६. मी ग्रामपंचायत सांगवी येथे सचिव म्हणून जुन २०२४ ते आजपर्यंत कार्यरत आहे. त्यापुर्वी देखील मी सन २०१८ ते ऑक्टोबर २०२३ पर्यंत सचिव म्हणून कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २००५ ते २०१८ या कालावधीमध्ये ग्रामपंचायत सांगवी येथे कार्यरत नव्हतो. सन २००५ ते २०१८ या कालावधीमध्ये कोण कोण सचिव होते, हे मला ठाम सांगतो येणार नाही, परंतु मी सचिव पदाचा कार्यभार श्री. नागे यांच्याकडून सन २०१८ मध्ये घेतला. हे म्हणणे खरे आहे की, पदभार घेण्यादेण्याच्या बाबतीतचे रेकार्ड जतन करावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, पदभार स्वीकारल्यानंतर कोणकोणते दस्त स्वीकारण्यात आले व त्यांचे संपुर्ण वर्णन रेकॉर्डमध्ये नमुद केलेले असते. मी पदभार स्वीकारल्याचे रेकॉर्ड माझ्याकडे आहे. नागे साहेबांनी मला पदभार यादीमध्ये जे जे कागदपत्र दिले त्याचा उल्लेख त्या यादीमध्ये आहे. पदभार स्वीकारतांना दस्त स्वीकारल्याची यादी मी पुढील तारखेस न्यायालयात हजर करु शकतो.

७. हे म्हणणे खरे आहे की, मालमत्ते संबंधीचे रेकॉर्ड हे नमुना ८, ९, १० मध्ये नमुद केले जातात. हे म्हणणे खरे आहे की, नमुना ८ व नमुना ९ हे कायम रेकॉर्ड असते. नमुना ८ व ९ या रेकॉर्डमध्ये दर ४ वर्षांनी फेरआकारणी केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, फेरआकारणी करताना मालमत्तेचा क्रमांक हा बदलला जाऊ शकतो. हे म्हणणे खरे आहे की, गाव नमुना ८ व ९ मधील पत्रकामध्ये बदल करावयाचे असल्यास त्या संबंधितीचा ग्रामपंचायतीचा ठराव लागतो त्याबाबतचे अधिकार सचिवांना नसतात. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीमधील मिळकतीचा कर हा मिळकतीच्या बांधकामावर आकारला जातो. मी स्वतःहून सांगतो की, तो मोकळ्या मिळकतीवर देखील आकारला जातो. ग्रामपंचायतीमध्ये मिळकतीचा बांधकामाबाबत व मोकळ्या जागेवरील कर हा रेडी रेकनर द्वारे आकारला

जातो. मोकळ्या जागेवरील कर आकारण्याबाबत माझ्याकडे शासनाचे परिपत्रक आहे. सदर परिपत्रक मी पुढील तारखेला आणू शकतो.

८. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीमधील मिळकतीच्या नोंदी करावयाच्या असल्यास ग्रामपंचायत मिळकतीची नोंद पहिल्यांदा नमुना ८ मध्ये केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, नमुना ८ पत्रकामध्ये केलेली नोंद ही नमुना ९ पत्रकामध्ये घेतली जाते व त्यानुसार नमुना १० नुसार मालमत्ता धारकास पावती दिली जाते. सदर वाद मिळकतीचे नमुना ८ व ९ चे रेकॉर्ड आमच्याजवळ आहेत. ग्रामपंचायत मिळकतीमधील नमुना ८ व ९ च्या प्रती आमच्या ग्रामपंचायतीमधून नकलेद्वारे दिल्या जातात. आता मला नि.क्र.५२ कडील नमुना ८ दाखविण्यात आला. त्यावर ग्रामपंचायत सांगवी यांचा शिक्का आहे.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | सदर ग्रामपंचायतीचा शिक्का हा बाहेर उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय ? |
| **उत्तरः** | ते मी सांगू शकत नाही, बाहेर देखील तो मिळू शकतो. |

९. नि.क्र.५२ कडील सही सचिवाची आहे अथवा नाही, हे मी सांगू शकत नाही. कारण मी तेथे कार्यरत नव्हतो. नि.क्र.५२ कडील दस्त हा सांगवी ग्रामपंचायत येथून पारीत केला आहे, हे मी सांगू शकत नाही. आता मला नि.क्र.४५ च्या दस्तासोबत जोडलेला नमुना ८ दाखविण्यात आला. त्यावर ग्रामपंचायतचा शिक्का व सही आहे. सदर नमुना ८ कडील दस्त हा ग्रामपंचायत सांगवी येथील सचिवानी पारीत केलेला आहे, हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २००९ मध्ये मी ग्रामपंचायत सांगवी येथे सचिव नव्हतो म्हणून मी सदर दस्ताबाबत सांगू शकत नाही. वाद मिळकतीबाबतचे नमुना पत्रक नि.क्र.५२ व ४५ कडील ८ व ९ हे बनावट केल्याबाबतची तक्रार मला किंवा माझ्या अगोदर असलेल्या संबंधित सचिवांनी केली याबाबत मला पदभार यादीत कागद आढळून आला नाही.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | सदर दस्ताबाबत तक्रार दिली असती तर ते तुम्हाला तुमच्या पदभार यादीसोबत मिळाले असते, हे म्हणणे खरे आहे का ? |
| **उत्तरः** | असे काही नसते, तक्रार दिली म्हणजे ती पदभार यादीसोबत येते असे नाही. |

१०. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतद्वारे जी काही कार्यवाही केली जाते किंवा जी काही कार्यवाही ग्रामपंचायतवर होते त्याचे रेकॉर्ड ग्रामपंचायत मध्ये ठेवावे लागते.

माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमुना केलेल्या मजकूरानुसार वादींनी खुल्या प्लॉटचा खोटा दस्त तयार करुन सरकारी मालमत्ता हडप करण्याच्या उद्देशाने बनावट खरेदीखत नोंदविले याबाबत, माझ्या अगोदर रिपोर्ट नोंद केला अथवा नाही, हे मला माहित नाही. परंतु मी माझ्या कार्यकाळात तसा कोणताही रिपोर्ट दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी यांनी तथाकथित केलेले खरेदीखत खोटे व चुकीचे आहे, याबाबत मी वादींना नोटीस पाठविलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतमध्ये जर एखादी नोंद चुकीची झाली अथवा चुकीचा ठराव पारीत करण्यात आला, तर त्याची माहिती संबंधित गट विकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना द्यावी लागते. नि.क्र.४५ कडील खरेदीखत हे चुकीचे आहे, याबाबतची माहिती मी माझ्या वरीष्ठांना दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादींनी खुल्या प्लॉटचा खोटा दस्त तयार करुन सरकारी मालमत्ता हडप करण्याच्या उद्देशाने बनावट खरेदीखत नोंदविले, याबाबतचा कोणताही आधारभुत कागद नसल्याने तुम्ही त्याच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादींनी खुल्या प्लॉटचा खोटा दस्त तयार करुन सरकारी मालमत्ता हडप करण्याच्या उद्देशाने बनावट खरेदीखत नोंदविले, हे माझे म्हणणे खोटे आहे.

११. हे म्हणणे खरे आहे की, यशवंत ग्राम समृधी योजना अंतर्गत रस्त्याकामी जर गावातून वर्गणी जमा केली असेल तर त्याचे सुध्दा रेकॉर्ड ग्रामपंचायत यांना जतन करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, यशवंत ग्राम समृधी योजना अंतर्गत रस्त्याकरीता ठराव पाठवायचा असेल तर त्याचा आवक जावक नोंद घेवून तो पंचायत समितीकडे पाठवावा लागतो. यशवंत ग्राम समृधी योजना अंतर्गत रस्त्याकामी गोळा केलेल्या वर्गणीचा रेकॉर्ड हा माझ्या पदभारामध्ये असायला पाहिले. सदर रस्त्याबाबतचा ठराव पंचायत समितीकडे पाठविण्यात आला ते आवक जावक रजिस्टर देखील ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध आहे. सदर प्रकरणामध्ये यशवंत ग्राम समृधी योजना अंतर्गत रस्त्याबाबत गोळा केलेल्या वर्गणीचा रेकॉर्ड व सदर रस्त्याबाबत पंचायत समिती यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या आवक जावक चे रेकॉर्ड मी दाखल केलेले नाही.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | यशवंत ग्राम समृधी योजना अंतर्गत रस्त्याबाबत वर्गणी गोळा केलेली नव्हती तसेच रस्ता बांधकामाचा प्रस्ताव पंचायत समितीकडे पाठविण्यात आलेला |

| | |
|---|---|
| | नव्हता म्हणून तुम्ही तो दाखल केलेला नाही ? |
| **उत्तरः** | सदर योजना सन २००५ ची आहे, मी दाखल केले नाही, तत्कालीन सचिवाने दाखल केले असेल. |

१२. तत्कालीन सचिवाने कोणते कागदपत्र दाखल केले ते मी अभिलेख पाहून सांगू शकतो. आता मला न्यायालयीन संपुर्ण अभिलेख दाखविण्यात आला त्यामध्ये नि.क्र.११५ सोबत दाखल केलेला दि.०२.१०.२००५ रोजीचा ठराव हा तत्कालीन सचिवांनी दाखल केला होता. त्यास **नि.क्र.१५०** देण्यात येत आहे. तसेच नि.क्र.११५ यादी सोबत दस्त क्र.४ कडील ठराव तत्कालीन सचिवांनी दाखल केला होता. त्यास **नि.क्र.१५१** देण्यात येत आहे. आता मला नि.क्र.१५० कडील ठरावाची प्रत दाखविण्यात आली. त्याचे मुळ रेकॉर्ड आज मी माझ्या सोबत आणले का ? सदर प्रश्न विचारल्यानंतर साक्षीदार याने साक्षी कठड्यामध्ये त्याच्यासोबत आणलेले रजिस्टर पाहिले व रेकॉर्ड आणले असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१५० कडील ठरावाची प्रत ही मुळ रजिस्टरवरुन झेरॉक्स काढलेली प्रत आहे व त्यावर तत्कालीन सचिव यांनी सही करुन शिक्का मारलेला आहे. आता मला नि.क्र.१४६ सोबत दाखल केलेली ठरावाची प्रत दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१४६ कडील प्रत ही त्याच ठरावाची प्रत आहे जी नि.क्र.१५० कडे आहे. आता मला नि.क्र.१४६ व १५० कडील ठरावाच्या प्रती दाखविण्यात आल्या. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही प्रत सारख्या नाहीत. मी स्वतःहून सांगतो की, नि.क्र.१४६ कडील विषय सुची आहे व नि.क्र.१५० कडील ठरावाची प्रत आहे.

१३. नि.क्र.१५० कडील ठराव हा पान क्र.१७ वर नमुद केलेला आहे. परंतु माझ्यासोबत मी आणलेल्या मुळ रजिस्टर मध्ये सदर ठरावाच्या येथे पान क्र.१७ कोठेही नमुद केलेले नाही. मी आणलेल्या मुळ रजिस्टरमध्ये एकुण १ ते ७० अशी पाने आहेत. सदर मुळ रजिस्टरमध्ये पान क्र.१७ वर दि.२२.०७.२००५ च्या सभेचा ठराव नमुद केलेला आहे. मी स्वतःहून सांगतो की, सदर रजिस्टर हे मासिक सभेचे आहे.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | नि.क्र.१५० कडील ठराव हा तुम्ही आणलेल्या मुळ रजिस्टर च्या कितव्या पानावर आहे ? |
| **उत्तरः** | साक्षीदार यांनी त्यांच्या जवळील आणलेले मुळ रजिस्टर पाहिले व सदर ठराव |

| | |
|---|---|
| | हा पहिल्यांदा पाहिलेल्या रजिस्टरवर नसल्याचे सांगितले. त्यांच्यासोबत आणलेल्या दुसऱ्या रजिस्टर वर असल्याचे सांगितले. |

१४. आता मी पुन्हा सांगतो की, नि.क्र.१५० कडील ठरावाचे मुळ रेकॉर्ड मी आणलेल्या दोन्ही रजिस्टरमध्ये दिसून येत नाही. आता मला नि.क्र.१५० कडील ठराव दाखविण्यात आला. त्यावर ग्रामसभेच्या येथे खाडाखोड केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आणलेल्या मुळ रेकॉर्डमध्ये अशी खाडाखोड केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१५० व नि.क्र.१४६ कडील ठराव अस्तित्वात नाही, त्याचे खोटे कागदपत्र करुन मी आज न्यायालयात आणलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गावातील राजकारणाला बळी पडून मी वादींना त्रास देण्याच्या उद्देशाने सदर खोटे दस्त तयार केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१५० व १४६ कडील ठराव हे तत्कालीन सचिवांनी खोटे तयार करुन अभिलेखावर दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर कागदपत्र खोटे केल्यामुळे ते एकमेकांशी जुळत नाहीत.

१५. हे म्हणणे खरे आहे की, गावातील रस्ते किती फुटाचे आहेत, त्याचा रेकॉर्ड ग्रामपंचायतकडे नाही. सदर वाद मिळकतीवर रस्ता बांधण्यात आला ती जागा ग्रामपंचायतीची मालकीची आहे, याबाबत चौकशी केल्याबाबतचा दस्त माझ्याकडे नाही. वाद मिळकत मी पाहिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, रोडच्या पश्चिमेला लागून घर आहेत. वाद मिळकतीच्या पुर्वेला रोड आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याला लागून पुर्वेस घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर घराचे बांधकाम पुर्व पश्चिम २५ फुट व उत्तर दक्षिण १० फुट आहे. सदर घराचे क्षेत्र मला सांगता येणार नाही, परंतु सदर जागा ही २५ बाय १० फुट इतकी आहे. हे म्हणणे खरे आहे की, २५ बाय १० फुट ही घराची जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर घराच्या पश्चिमेला खुली जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खुल्या जागेचे क्षेत्र पुर्व पश्चिम १८ फुट व उत्तर दक्षिण २१ फुट असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोकळ्या जागेचे क्षेत्र हे वादी यांच्या मालकीचे होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोकळी जागा ही वादी यांच्या मालकीची असल्याने तत्कालीन सचिवांनी वादीच्या नावे नमुना ८ नोंद केला होता. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायतीमधून नमुना ८ हे रेकॉर्ड पाहून वितरीत केले जातात. हे म्हणणे खरे आहे की,

वाद मिळकतीचा पुर्वीचा क्र.१६६ होता तो आकारणीमध्ये बदलून १७४ करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, मालकी हक्काचे दस्त व ग्रामपंचायतीमधील रेकॉर्ड हे वेगवेगळे असू शकतात. आज मी माझ्यासोबत ग्रामपंचायत सांगवीचे कर आकारणी रजिस्टर आणलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कर आकारणी रजिस्टर मध्ये खाडाखोड करण्याचे मला अधिकार नाहीत.

१६. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.१ व २ मधील मजकूर हा मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायतने वादीच्या मालकीच्या प्लॉटवर अतिक्रमण करुन रस्ता बांधलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– ०६.०२.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.02.06 17:34:13 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०६/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०६/०२/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०६/०२/२०२६ |